INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 11 | DECEMBER - 2022

# “बहिणाबाईंच्या कवितेतील मानवी मूल्यांचा शोध”

**प्रा. डॉ. पी. आर. जाधव**
**मराठी विभागप्रमुख, स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,**
**नांदगाव पेठ ता. जि. अमरावती.**

## प्रस्तावना:-



खानदेशातील काळ्याशार भूमीत अंकुरासारख्या रुजलेल्या, वाढलेल्या व काळ्या आईचे व्यक्तिमत्व लेऊन आलेल्या, तिच्या सारख्याच कणखर आणि मृदूसोशिक व क्षमाशील व्यक्तिमत्त्वाचा गुण आणि गंध घेऊन आपल्या काव्यरूपातून त्या गुणगंधाला प्रकट करणाऱ्या, बहिणाबाई चौधरी ह्या निसर्ग कन्या म्हणून ओळखल्या जातात.

'बहिणाबाईची गाणी' ही मराठी काव्यातील अपूर्व निर्मिती आहे. प्रतिभा ही कवीला निसर्गाचे देणे आहे हे बहिणाबाईच्या कवितेने सिद्ध केले आहे. बहिणाबाईने कधी शाळेचे तोंड पाहिले नाही. त्यांना लिहिता व वाचता येत नव्हते. रोजच्या घरातील व शेतीतील काम करता करता त्यांनी जी गाणी रचली तीच आज कवितेतील बावनकशी सोने म्हणून ओळखले जाते.

आपल्या काव्याने मराठी वाङ्मयात अजरामर झालेल्या बहिणाबाईच्या काव्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्या निसर्गकन्या म्हणून जरी ओळखल्या जात असल्या तरी केवळ निसर्गाचेच वर्णन त्या करीत नाहीत, तर निसर्गाच्या विविध रूपांना आपल्या जन्मजात प्रतिभेमुळे मानवी रूपात प्रगट करतात. बहिणाबाई आपल्या कवितेतून मानवी जीवनाचे रहस्य रसाळ शब्दांमध्ये सहजतेने उलगडतात. मानवी जीवनातील मूल्यांचा परिचय व त्या मूल्यांची शिकवण आहे हे बहिणाबाईंच्या कवितेतून सतत जाणवते.

## मानवी मूल्यांची परिभाषा:-

बहिणाबाईंच्या कवितेतून अभिव्यक्त झालेल्या मानवी मूल्यांचा शोध प्रस्तुत शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी मानवी मूल्यांची परिभाषा काय आहे? हे पाहणे संयुक्तिक ठरते. मानवी मूल्यांविषयी डॉ. सुनंदा जामकर म्हणतात-"एखाद्या वस्तूमध्ये अथवा क्रियेमध्ये असणाऱ्या चांगल्या किंवा इष्ट गुणांमुळेच त्या वस्तूंची किंमत ठरत असते. तोच नियम मानवी वृत्तीला लागू पडतो. माणसातील गुणांवरून त्याचे व्यक्तिमत्व चांगले किंवा वाईट ठरत असते. त्यामुळे व्यापक अर्थाने चांगुलपणा हे विधायक मूल्य तर वाईटपणा हे निषेधक मूल्य होय. विधायकतेवर दृष्टी ठेवून पुढे चांगुलपणातलाच आपण 'मूल्य' या संज्ञेने संबोधू लागतो."(१) याच मूल्याविषयी पुढे त्या म्हणतात-"ज्यांची आकांक्षा धरावी वा पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे मूल्य.

परंपरेला धरून एखाद्याची शारीरिक आणि स्वास्थ्याला तसेच समाजहिताला आणि समायोजनाला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्त्वे म्हणजे मूल्य होय". (२)

एकंदरीत मानवी मूल्य म्हणजे शुद्ध प्रेम आहे. माणसाने माणसाला माणुसकीने वागवून आपला मानवता धर्म पाळावा असेच म्हणता येईल. बहिणाबाईची कविता वाचत असताना वरील मानवी मूल्यांचे ठाई- ठाई दर्शन घडते. मानवी मूल्याचा संदेश ते त्यांना बहिणाबाई म्हणतात-

**"नको लागू जीवा, सदा मतलबासाठी,**
**हिरिताचं देणं घेणं, नही पोटासाठी"**

मानवी जीवनाचे सार शुद्ध प्रेमात आहे याची जाणीव बहिणाबाई निसर्ग प्रतिमांमधून करून देतात.

**"उभे शेतामध्ये पीकं, ऊन वारा खात खात,**
**तरसती कव्हा जाऊ, देवा, भुकेल्या पोटात,**

शेतातील पीके ऊन, वारा आणि पाऊस खात असते. मात्र भुकेल्या पोटात जाण्यासाठी ते तरसत असतात. निसर्गातील या घटकांमध्ये असलेला हा शुद्ध निःस्वार्थी भाव माणसांमध्ये केंव्हा येईल? बहिणाबाईंना माणसाच्या स्वार्थीपणाची जास्त चीड आहे. माणसाची नियत व त्याचा स्वार्थ आज माणसाला माणुसकीपासून दूर नेत आहे, याची अनेक कारणे आहेत. पैकी माणूस हा जन्मतःच परावलंबी असल्याने तो स्वार्थी झाला. आपला मतलब साधण्यासाठी इतरांवर अन्याय करायला तो मागेपुढे पाहत नाही. उपकार करणाऱ्यावर सुद्धा तो अपकार करतो. उपकार विसरण्याची त्याची ही वृत्ती जनावरात सुद्धा पाहायला मिळत नाही. अशा स्वार्थी माणसाला बहिणाबाई फटकारताना म्हणतात-

**"माणसा माणसा, तुझी नियत बेकार**
**तुयाहून बरं गोठ्यातलं जनावर"**

बहिणाबाईंच्या वरील ओळी माणसाच्या स्वार्थीपणावरील संताप व चीड व्यक्त करण्यास पुरेशा ठरतात.

**"माणसा माणसा, कधी होशील माणूस,**
**लोभासाठी झाला, माणसाचा कानूस"**

माणसाच्या माणूसपणाला बहिणाबाईंनी घातलेली ही साद व्याकुळ हृदयाने केलेले हे आवाहन आहे. जगात स्वार्थाचा वनवा पेटलेला असताना व माणूस पशुपातळीपेक्षाही हीन दर्जाची पातळी गाठू लागला असताना माणसाला मानवमूल्य शिकण्याचा प्रयत्न बहिणाबाई करतात. लोभासाठी व स्वतःच्या स्वार्थासाठी माणसे एकमेकांच्या जीवावर उठल्याने आज

मानवताच रक्तबंबाळ झाली आहे. त्यामुळे बहिणाबाईचे मन कळवळते व तळमळते. मानवतेच्या कल्याणाची अंतकरणापासून वाटणारी चळवळ या ओळीतून जाणवते. बहिणाबाईच्या मानवताविषयक या वृत्तीविषयी डॉ. मनोज तायडे म्हणतात-" माणसावर, माणसाच्या कर्तृत्वावर बहिणाबाईंची प्रचंड श्रद्धा आहे. जीवनात इतकी संकटे सोसून त्या कधी निराश झाल्या नाहीत, कोसळून पडल्या नाहीत. प्रत्येक आपत्तीला यशस्वीपणे तोंड देणाऱ्या या स्त्रीने पलायनवाद स्वीकारला नाही. त्यामुळे त्यांचे वाङ्मयही पलायनवादापासून, निराशावादापासून मुक्त असून जीवनावर प्रगाढ प्रेम करणारे आहे. जीवन सुंदर आहे, शाश्वत आहे; ते म्हणजे केवळ भ्रम नव्हे. जन्मापासून मृत्यूपर्यंतचे आयुष्य म्हणजेच खरे जीवन होय. ते आनंदाने, परोपकारे दुसऱ्याची दुःख समजून घेत जगले पाहिजे. रडत-कुडत भेलकंडत जगणे म्हणजे जगणे नव्हे. दुःखाच्या छाताडावर पाय देऊन उज्वल भविष्यकाळाकडे पाहायचे असते".(३)

ज्या काळ्या आईवर बहिणाबाईने अपार प्रेम केले त्याच काळ्या आईच्या दुधावर जोपासल्या गेलेला माणूस आज अहंकाराने व मीपणाने स्वतःला दुनियाचा राजा समजायला लागला. अशा मीपणात लिप्त असलेल्या माणसाला बहिणाबाई त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देताना म्हणतात-

**"सर्व्या दुनियेचा राजा, म्हने, मी कोण, मी कोण?**
**अशा त्याच्या मीपनाले, मसणात सिं व्हासन'**

मानवी जीवन हे नश्वर आहे. मात्र तरी या नश्वर जीवनाचा माणसाला मोठा अभिमान वाटतो. हा अभिमान किती खोटा आहे हे बहिणाबाई अशा मीपणाला मसणात सिंव्हासन आहे याची जाणीव करून देतात. जन्माला आलेल्या प्रत्येकाला मरावचं लागतं. मरण हे अंतिम सत्य आहे. परंतु माणूस स्वार्थांदाने आंधळा झाल्याचे हे विसरला. या स्वार्थी माणसाला मानवतेचे मूल्य शिकवताना बहिणाबाई म्हणतात-

**"जग जग माझ्या जीवा, असं जगणं तोलाचं**
**उच्च गगनासारखं, धरतीच्या रे मोलाचं"**

माणसाने जगावे कसे तर उच्च गगनासारखे म्हणजेच आभाळ ज्याप्रमाणे सर्वांना सारखा न्याय देते, सोबतच आपले कर्तृत्व मोठे करायला सांगते. अशा उच्च आकांक्षा घेऊन माणसांनी आभाळासारखे व्हावे. परंतु त्याने हेही विसरू नये की, आपले पाय जमिनीवर असायला हवे. धरती ज्याप्रमाणे सर्वांचे अपराध पोटात घेते, सर्वांचे पालन- पोषण करते आणि सर्वांनाच उभे राहायला जागा देते. त्या धरतीचे हे वैशिष्ट्य मानवात यावे व गगन धरतीप्रमाणे तोला-मोलाचे जगावे अशी अपेक्षा माणसाकडून बहिणाबाई व्यक्त करतात. मानवी मनाचा तळ अजूनही कुणाला गवसला नाही. हे मन नेमके कसे आहे? हे शास्त्रज्ञाला सांगताच आले नाही. मात्र बहिणाबाई मनाला व त्याच्या स्थितीला अलगद पकडताना म्हणतात-

**"माणसापरी माणूस, राहतो रे येडजाना**
**अरे होतो छापीसनी, कोरा कागद शहाणा!"**

माणूस जन्माला येतो तो रडतच येतो, त्याचे हे रडगाणे ते आयुष्यभर सुरू ठेवतो. इच्छापूर्ती झाली नाही की, रडगाण्याला तो सुरुवात करतो. या रडगाण्यानेच माणसाच्या संसारी चव घालवली तीच परत मिळवायची असेल तर बहिणाबाई चौधरी म्हणतात-

**"रडू नको माझ्या जीवा, तुला रड्याची रे सव**
**रडू हासव रे जरा, त्यात संसाराची चव!"**

आपले दुःख विसरून या रडगाण्याला हास्यात परावर्तित करण्यातच खऱ्या संसाराची चव आहे व तेच खरे जीवन आहे. हा मोलाचा उपदेश रडगाणे गाणाऱ्या माणसाला बहिणाबाई देतात. कवितेतून माणसाच्या स्वार्थी वृत्तीवर जशी टोकाची भूमिका घेतात तशीच त्याला समजण्यासाठी त्या उपदेशकाची भूमिका निभावतात. मानवी मूल्य काय असते हे सांगताना बहिणाबाई म्हणतात-

**"सिलगावली रे काडी, ज्योत पेटली पेटली**
**आंधाऱ्यानले ब्याहीसनी, मेली इझीसनी गेली "**

ज्योतीला प्रकाशमान करण्यासाठी आगपेटीची काडी स्वतःला प्रथम जाळून घेते, त्यात ती संपून जाते. मात्र ज्योतीला प्रकाशमान करते. स्वतः दुःख भोगून किंवा त्याग करून इतरांचे जीवन प्रकाशमान करण्याची किमया जशी त्या छोट्या आगपेटीच्या काडीत आहे तशी किमया माणसाने करावी. इतरांसाठी झिजावं, दुसऱ्याच्या सुखदुःखात आपले सुख मानावे व स्वार्थीपणा विसरावा. ही जाणीव वरील ओळीतून बहिणाबाई करून देतात.

मानवी मन हे जसे श्रद्धाळू तसेच ते अंधश्रद्धाळू आहे. माणसाचा आपल्या कर्तृत्वापेक्षा दैववादावर अधिक विश्वास असल्याने माणूस आळशी बनला आहे. कुठलीही गोष्ट सहजतेने प्राप्त व्हावी हा त्याचा मानस असतो. म्हणूनच तो ज्योतिषाचे दार गाठतो. शिक्षित असणारा माणूसही यापासून दूर नाही. परंतु अशिक्षित असणाऱ्या बहिणाबाई मात्र दैववादावर अजिबात विश्वास ठेवत नाही. दारी आलेल्या ज्योतिषाला त्या म्हणतात-

**"नको नको रे ज्योतिषा, नको हात माझा पाहू**
**माझं दैवं माले कये, माझ्या दारी नको येऊ".**

सुशिक्षितांना लाजवणारा अनपढ मनाचा हा विचार पाहून बहिणाबाईचे मन किती समृद्ध होते, तिच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. दैववादापेक्षा कर्तृत्व हे कधीही श्रेष्ठ असल्याने त्या कर्तृत्वाची जाणीव माणसाने ठेवली पाहिजे आणि हे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी घाम गाळावा लागतो याची जाणीव करून देताना बहिणाबाई म्हणतात-

**"काया काया शेतामंधी, घाम जिरव जिरव**

**तवा उगलं उगलं, कायामधून हिरवं"**

श्रमप्रतिष्ठेला महत्त्व देऊन दैववादाला नाकारणाऱ्या बहिणाबाईला कोण अनपढ म्हणेल ? बहिणाबाईच्या या वृत्तीविषयी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत नोंदवावेसे वाटते-

"जन्मताच उत्तुंग प्रतिभेचे वरदान लाभलेल्या बहिणाबाई जीवनाकडे अतिशय समंजसपणे पाहतात; सगळे समजावून घेण्याच्यादृष्टीने पाहतात. तरीही त्या कमालीच्या बुद्धिनिष्ठ आहेत. सश्रध्य असल्या तरी, ही श्रद्धा त्यांचे बौद्धिक सामर्थ्य पंगू करीत नाही. म्हणूनच त्या 'ज्योतिषाला तळहातावर कसले भविष्य ?'असला प्रश्न विचारू शकतात; तळहातावरच्या रेघोट्या त्या रेगोट्याच असे रोखठोकपणे सांगू शकतात."(४)

## समारोपः-

बहिणाबाईच्या कवितेतील जीवनमूल्याकडे पाहताना असे दिसून येते की, रडत- भेकत जीवन जगता येत नाही; तर ते आपल्या कर्तृत्वाने सर्वांग सुंदर बनवावी लागते. कर्तृत्वाने राईचा पर्वतसुद्धा करता येतो. यावर बहिणाबाईंची श्रद्धा दिसते. स्वतःच्या दैनंदिन जीवनचक्रात अडकलेल्या असूनही बहिणाबाई मानवी जीवनाकडे डोळसपणे पाहतात. शेतातील कष्ट उपसताना व्यवहारिक जगात वावरताना त्यांना आलेल्या मानवी अनुभवामुळे त्या मानवी मूल्यांविषयी हक्काने सांगू शकतात. निसर्ग प्रतिमांमधून मानवी मूल्यावर बहिणाबाईंनी केलेले हे भाष्य शास्त्रीय व सुसंगत आहे. बहिणाबाईंचा हा दृष्टिकोन गीता तत्वज्ञानापेक्षा म्हणूनच कमी नाही.

## संदर्भ टिपाः-

(१) डॉ.सुनंदा जामकर, प्रकरण चार 'राष्ट्रसंत प्रणित मानव संसाधन विकास कार्य'-लेख-'राष्ट्रसंत तुकडोजी : जीवन व कार्य', संपा डॉ. सुभाष सावरकर, 'मराठी जनसाहित्य परिषद' अमरावती, प्रथमावृत्ती- ऑक्टोबर 2007, पृष्ठ क्र, 132.

(२) तत्रैव- पृष्ठ क्र. 133.

(३) डॉ. मनोज तायडे, 'आस्वादनामा'- स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती जून 2002, पृष्ठ क्र. 36.

(४) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'बहिणाबाईंची कविता- लेख-' मराठी कविता आकलन आणि आस्वाद' स्वरूप प्रकाशन- औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2010, पृष्ठ क्र. 138.

(५) बहिणाबाई चौधरी 'बहिणाबाईची गाणी' सुचित्रा प्रकाशन, मुंबई, आवृत्ती सहावी 2001.